जळगाव दि.२१ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत केसीआयआयएल विभागाद्वारे स्टार्टअप-उद्योजकता विकास कार्यक्रम या दोन दिवसीय मार्गदर्शन सत्राचे आयोजन दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे.

उद्योजकता आणि स्टार्टअप संदर्भात जनजागृती करण्यासाठी या मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात पहिल्या दिवशी दि. २४ फेब्रुवारी रोजीच्या मार्गदर्शन सत्रात पौरस संचेती, डॉ.युवराज परदेशी (कंटेंट ओशन प्रा.लि.), निखिल जाधव (परिवर्तन इनोव्हेशन प्रा.लि.) यांचे व्याख्यान होणार असून दुसऱ्या दिवशी दि. २५ फेब्रुवारी रोजी निखिल पाटील (कौवेड गौवाधरती प्रोडक्ट प्रा.लि.), सीए रवींद्र पाटील यांची व्याख्याने होणार असून यावेळी प्रा.मधुलिका सोनवणे व डॉ.राजेश जावळेकर हे उपस्थित राहणार आहेत. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनसत्राचा लाभ घ्यावा असे आवाहन सागर पाटील (मुख्य कार्यकारी अधिकारी,केसीआयआयएल) यांनी दिली.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.२१ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राच्या वतीने युवा साहित्य अकादमी पुरस्कृत मराठी साहित्यकृतीतील समकालीन जाणिवा या विषयावर प्रा.भारती सोनवणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

यावेळी अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे हे मंचावर उपस्थित होते. प्रा.सोनवणे यांनी आपल्या व्याख्यानात युवा साहित्य अकादमी पुरस्कार सर्जनशील लेखनासाठी ३५ वर्षांच्या आतील युवा साहित्यिंकासाठी दिला जातो असे सांगुन त्यांनी मराठी साहित्यातील युवा साहित्य अकादमी पुरस्कृत विविध समकालीन साहित्यकृतींवर प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी विविध संदर्भ दिले. प्रा.म.सु.पगारे यांनी अध्यक्षीय समारोपात साहित्य कृती या सत्यशोधक व समकालिन परिस्थीती मांडणार असल्यास त्या ताकतवान व उर्जा निर्माण करणाऱ्या असतात असे मत मांडले. यावेळी प्रश्नोत्तरे झाली. या व्याख्यानास प्रशाळेतील शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि. २१ फेब्रूवारी, २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी